


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक


• वर्ष : ०३ • अंक : १८३ • पुणे • रविवार, दि. २२ मार्च २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

# रुपाली चाकणकरांची महिला आयोग अध्यक्षपदावरून गच्छंती?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रुपाली चाकणकर यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. चाकणकर यांना नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण भोवलं आहे. अशोक खरातला एका महिलेचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. त्यानंतर आता या अशोक खरातचे अनेक कारनामे समोर आले होते. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे खरात सोबतचे फोटो आणि त्याची पाद्यपूजा करतानाचा व्हिडिओ समोर आला होते. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत होती. त्यानंतर आता चाकणकर यांनी राजीनामा दिला आहे.

काही वेळापूर्वी रूपाली चाकणकर यांनी राजीनामा द्यावा असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर चाकणकर यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी राजीनामा दिला आहे. चाकणकर यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे आपला राजीनामा सोपवला आहे. रुपाली चाकणकर यांनी राजीनामा पत्रात म्हटले की,

मी, सौ. रुपाली निलेश चाकणकर, वरील विषयान्वये आपणांस विनंतीपूर्वक कळवू इच्छिते की, दि. 15 ऑक्टोबर 2024 रोजी माझी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची अध्यक्षा म्हणून नियुक्ती झाली होती. माझ्या वैयक्तिक कारणाने मी स्वेच्छेने सदर पदाचा राजीनामा ह्या पत्राद्वारे आपणांस सादर करत आहे. आजवर माझ्यावर विश्वास दाखवून आपण मला सर्वतोपरी सहकार्य केले त्याबद्दल मी आपली व सर्व सहकाऱ्यांची शतशः ऋणी आहे. भविष्यातही आपले असेच सहकार्य राहील असा मला विश्वास आहे. तरी आपण माझा अध्यक्षा, राज्य महिला आयोग ह्या पदाचा राजीनामा स्वीकारावा अशी आपणांस नम्र विनंती आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावरुन रूपाली चाकणकर यांना हटविण्यात यावे. बलात्कार प्रकरणातील आरोपी अशोक खरात आणि चाकणकर यांना समोरासमोर बसवून चौकशी करा आणि त्यांची नार्को टेस्ट करावी. तसेच त्यांना अटक झाली पाहिजे,अशी मागणी उध्दवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषदेत केली.



• महिलांच्या न्यायासाठी आता 'आंदोलनातून आलेले' नेतृत्व हवे •

## तृप्ती ताई देसाईच योग्य पर्याय! (पान ४ वर)

## भोंदूगिरी करणारे सर्वच जेरबंद होतील : बावनकुळे

**नाशिकमध्ये बलात्कार प्रकरणांमध्ये पोलिसांनी अशोक खरातला अटक केली आहे. यावर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विचारले असता त्यांनी म्हटले की, 'या प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्या सर्वांवर कारवाई सरकारच्या वतीने करण्यात येईल आणि सर्व दोषींना जेरबंद करण्यात येईल. तसेच अशा पद्धतीने अनेक भोंदू बाबा आश्रम उघडतात त्यामध्ये काय कार्य करतात हे अनेक वेळा पोलिसांना देखील माहित नसते असेही बावनकुळे म्हणाले.**

## अशोक खरातला संपवले जाईल : तृप्ती देसाई



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे राज्यात राजकीय वातावरण सध्या तापले आहे. या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांचे नाव आल्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात आली. अशामध्ये, एकीकडे रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगच्या अध्यक्ष्यपदाचा राजीनामा दिला आहे. आता त्यांच्याकडे असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही त्यांना राजीनामा द्यावी लागणार असल्याची माहिती आहे. भूमता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई यांनी अशोक खरात प्रकरणाबाबत गंभीर शंका उपस्थित केली आहे. त्यांच्या मते, या प्रकरणात काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता असून अशोक खरातला संपवण्याचा कट रचला जाऊ शकतो. असं तृप्ती देसाई म्हणाल्या. 24 मार्च रोजी त्याला न्यायालयात हजर करताना एन्काऊंटर होण्याची शंका त्यांनी व्यक्त केली आहे. तृप्ती देसाई यांनी असेही सांगितले की, खरातचे अनेक राजकीय नेते आणि मंत्र्यांशी संबंध असल्याने अनेक गोष्टी उघड होऊ शकतात. म्हणूनच अशोक खरात याला संपवण्याचा कट रचला जाऊ शकतो, असा दावा तृप्ती देसाई यांनी केला. तसेच मला नाशिकहून काही पीडित महिलांचा फोन आला होता. 24 मार्चपर्यंत अशोक खरातला पोलीस कोठडी मिळालेली आहे.






# पेटीएमचा नवा फीचर

## पेमेंटपूर्वीच रक्कम मोजण्यासाठी इन-बिल्ट कॅल्क्युलेटर

- **दैनंदिन व्यवहार झाले अधिक सोपे आणि अचूक**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

डिजिटल पेमेंट क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी पेटीएमने आपल्या ॲपमध्ये पेमेंट स्क्रीनवरच इन-बिल्ट कॅल्क्युलेटर सादर केला आहे. या नव्या सुविधेमुळे वापरकर्त्यांना पेमेंट करण्यापूर्वीच एकूण बिलाची रक्कम त्वरित मोजता येणार आहे. या फीचरमुळे आता वेगळ्या कॅल्क्युलेटर ॲपमध्ये जाण्याची गरज उरणार नाही. कॅल्क्युलेटर थेट पेमेंट फ्लोमध्ये कार्यरत असल्याने दैनंदिन व्यवहार अधिक जलद आणि सोपे होणार आहेत. विशेष म्हणजे, एकूण रक्कम आकड्यांमध्ये तसेच शब्दांमध्ये दाखवली जाणार असल्याने पेमेंटमधील चुका टाळण्यास मदत होणार आहे. ही सुविधा विशेषतः किराणा दुकानं, भाजीपाला बाजार, औषधालये आणि स्थानिक दुकाने यांसारख्या ठिकाणी उपयुक्त ठरणार आहे, जिथे किंमती तोंडी सांगितल्या जातात. पेटीएमच्या प्रवक्त्याने सांगितले की, "दैनंदिन पेमेंटच्या गरजांनुसार सोपे आणि व्यावहारिक उपाय देणे हा आमचा उद्देश आहे. या फीचरमुळे रक्कम मोजणे अधिक अचूक आणि सुलभ झाले आहे." या नव्या सुविधेमुळे मोबाईल पेमेंट्स अधिक वेगवान, अचूक आणि विश्वासार्ह बनवण्याचा पेटीएमचा प्रयत्न असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

# बाणेरमध्ये फेदरलाइटचे १०,००० चौ. फुटांचे अनुभव केंद्र सुरू

## आधुनिक कार्यस्थळ आणि शैक्षणिक फर्निचर उपायांची नवी दिशा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कार्यस्थळ आणि शैक्षणिक फर्निचर उपायांमध्ये अग्रगण्य असलेल्या फेदरलाइट ग्रुपने पुण्यातील बाणेर येथे आपले अत्याधुनिक १०,००० चौ.फुटांचे अनुभव केंद्र सुरू केले आहे. या केंद्रामुळे उद्योग, शैक्षणिक संस्था आणि सरकारी विभागांना आधुनिक कार्यस्थळ रचना प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळणार आहे. या अनुभव केंद्राचे उद्घाटन पंचशील रियल्टीचे संचालक सागर चोरडिया यांच्या हस्ते झाले. यावेळी



फेदरलाइट समूहाचे व्यवस्थापकीय संचालक मनोहर गोपाल, संचालक लव जे. चेल्लार्म, सहसंचालक किरण डी. चेल्लार्म आणि व्यवसाय प्रमुख नितीन घाग यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. बाणेरच्या मध्यवर्ती ठिकाणी उभारलेले हे केंद्र आधुनिक कार्यालयीन आणि शैक्षणिक फर्निचर उपायांचे सादरीकरण करते. यात वर्कस्टेशन्स, सहयोगी कार्यालयीन रचना, तंत्रज्ञानयुक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा फर्निचर, ग्रंथालय व्यवस्था आणि सभागृह आसन व्यवस्था यांचा समावेश आहे.

या केंद्रातून आर्किटेक्ट्स, उद्योजक आणि खरेदी व्यवस्थापकांना नवीन पिढीतील लवचिक आणि ॲडाप्टिव्ह फर्निचर प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे.

याप्रसंगी मनोहर गोपाल म्हणाले, "पुण्यातील या केंद्राद्वारे आम्ही उद्योग आणि शिक्षण क्षेत्राला अधिक प्रभावी सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत. आधुनिक कार्यसंस्कृतीसाठी आवश्यक असलेल्या रचना येथे अनुभवता येतील."

संचालक लव जे. चेल्लार्म यांनी सांगितले की, "आज फर्निचर हे केवळ सजावटीचे साधन नसून काम करण्याची पद्धत आणि संवादाची दिशा ठरवणारा महत्त्वाचा घटक बनला आहे."

फेदरलाइटच्या नव्या सिरीजमध्ये आरामदायी आसन व्यवस्था, ध्वनीरोधक कार्यकक्ष, सहकार्यपूर्ण कार्यक्षेत्र आणि तंत्रज्ञानयुक्त क्लासरूम फर्निचर यांचा समावेश आहे. हे सर्व उत्पादने कार्यक्षमता, आराम आणि लवचिकता लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आली आहेत.

कंपनीने शाश्वततेलाही प्राधान्य दिले असून, पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रिया, सौरऊर्जेचा वापर, पुनर्वापर आणि समावेशक रोजगार यावर भर दिला जात आहे.

फेदरलाइटने उद्योग, शैक्षणिक संस्था आणि आर्किटेक्ट्सना या अनुभव केंद्राला भेट देण्याचे आवाहन केले असून, भविष्यातील कार्यस्थळे अधिक तंत्रज्ञानाधारित, लवचिक आणि आरोग्यकेंद्री असतील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे




## रामदास आठवले यांच्या राज्यसभा निवडीबद्दल अभिनंदनाचा ठराव संमत

पुणे (आरंभ पर्व) : रिपब्लिकन पक्ष (आठवले गट कार्यकर्ता मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी पुण्यातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला, तसेच केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची सलग तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल पक्षाच्या वतीने अभिनंदन ठराव पारित करण्यात आला. या मेळाव्याला शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक नीलेश आल्हाट, नगरसेविका निशाताई मानवतकर, मोहन जगताप, महिपाल वाघमारे, संतोष आरडे, सुधीर वाघमोडे, माजी नगरसेवक जयदेव रंधवे, अर्जुन आल्हाट, आशिष भोसले, रवी अवसरमल, अक्षय अवसरमल, संतोष खरात, विनोद टोपे, संदीप धांडोरे, अविनाश गायकवाड, अविनाश कांबळे, अविनाश कदम, दिशा रणदिवे, मीनाज मोमिन, नीलेश रोकडे, यशवंत नडगम, शमसुद्दीन शेख, फिरोज खान, मुशताक शेख, रजाक सयद, अतुल भालेराव, बुद्धिशा रंधवे, उज्वला सर्वगोड,थोरात ताई,आदींसह साडेतीनशेहून अधिक कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी इतर पक्षांतून रिपब्लिकन पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पक्षवाढीसाठी स्थानिक पातळीवर नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांना नियुक्तीपत्रे २२ मार्च रोजी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते प्रदान करण्याचे ठरले. दरम्यान, महापालिका निवडणुकीनंतर पुणे शहरातील वाहतूक कोंडी, २४ तास समान पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा यांसारख्या प्रश्नांवर लक्ष वेधण्यात आले. पक्ष सत्तेत सहभागी असला तरी जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी आवश्यक असल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. पुण्यातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर पाठपुरावा करण्याचा आणि प्रसंगी आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा निर्धार यावेळी पक्षाने व्यक्त केला.




## महिला दिनानिमित्त "गौरव तीच्या कर्तृत्वाचा" कार्यक्रम उत्साहात संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : महिला दिनाचे औचित्य साधून डॉ. दुधभाते नेत्रालय व आदित्य फाउंडेशन यांच्या तर्फे "गौरव तीच्या कर्तृत्वाचा" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात सौ. राधिका जहागिरदार, डॉ. अपर्णा देशमुख आणि सौ. अनिता देवकर यांना "क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार" प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या कार्याची दखल घेत उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले. या प्रसंगी डॉ. दुधभाते नेत्रालयाचे सर्वेसर्वा डॉ. अनिल दुधभाते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त पोलिस सहायक आयुक्त रुक्मिणीताई गलांडे होत्या. तसेच महानगरपालिका नगरसेविका ज्योतीताई गोसावी, धनश्रीताई कोल्हे, विखे वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. राम पडळकर, दत्ताभाऊ कोल्हे, आसावरी चव्हाण, साहित्यिक गिरीश वसेकर, डॉ. स्नेहल मानपुत्र, शितल हिरळकर, गौरी निमकर, कोमल भोसले व अनुराग क्षीरसागर यांच्यासह डॉ. दुधभाते नेत्रालयाचा संपूर्ण कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करत समाजात प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

## वारज्यातील नवीन पूल खुला

पुणे (आरंभ पर्व) : मुंबई-बंगळूर महामार्गावरील वडगाव पूल ते वारजे दरम्यान होणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीतून प्रवाशांची आता सुटका होणार आहे. महामार्ग प्राधिकरणाने या मार्गावरील मुठा नदीवर बांधलेल्या नवीन पुलाचा मुंबई ते सातारा दिशेकडील भाग वाहतुकीसाठी खुला केला आहे. यामुळे वाहतूक कोंडीतून प्रवाशांना दिलासा मिळणार असून प्रवाशांच्या वेळेत मोठी बचत होणार आहे. याचा थेट फायदा दैनंदिन प्रवास करणाऱ्या सुमारे ६० ते ७० हजार वाहनचालकांना होणार आहे. मुठा नदीवरील अरुंद पुलामुळे या भागातून जाणाऱ्या वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

# पं. जितेंद्र अभिषेकी महोत्सवात दिग्गज कलाकारांचे सादरीकरण ठरले पर्वणी

- **महोत्सवाच्या तिसऱ्या सत्राचा पद्मविभूषण डॉ. एन. राजम यांच्या व्हायोलिन वादनाने समारोप**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शास्त्रीय गायन आणि व्हायोलिन वादनाच्या सुरांनी नटलेल्या दिग्गज कलाकारांच्या सादरीकरणामुळे पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचा दुसरा दिवस अक्षरशः रंगून गेला. देश-विदेशात हिंदुस्तानी संगीताचा ठसा उमटवणारे पंडित राम शंकर, ज्येष्ठ गायक डॉ. राजा काळे आणि पद्मविभूषण डॉ. एन. राजम यांच्या बहारदार सादरीकरणाने रसिकांना संगीताची पर्वणी लाभली.

तरंगिनी सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि 'आपला परिसर' संस्थेतर्फे कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित 20 व्या पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांना उत्स्फूर्त दाद दिली.




पंडित राम शंकर यांनी राग शुद्ध कल्याणने आपल्या मैफिलीची सुरुवात केली. विविध रागांनी सजलेले त्यांचे सादरीकरण रसिकांना भावले. सुयोग कुंडलकर (संवादिनी), चारुदत्त फडके (तबला), पल्लवी पिळणकर आणि मिलन धाक्रस (तानपुरा) यांनी त्यांना समर्थ साथसंगत दिली. "पंडित जितेंद्र अभिषेकी यांसारख्या महान कलाकाराच्या महोत्सवात सादरीकरणाची संधी मिळणे ही माझ्यासाठी गौरवाची बाब आहे," असे पंडित राम शंकर यांनी सांगितले. यावेळी शाम टेकाळे, स्वाती टेकाळे आणि दादा तरंगे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर पंडित जितेंद्र अभिषेकी यांचे ज्येष्ठ शिष्य डॉ. राजा काळे यांच्या मैफिलीने रंगत अधिकच वाढवली. राग झिंजोटीतील बंदिशींनी त्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

पंडित सुधीर नायक (हार्मोनियम) आणि प्रशांत पांडव (तबला) यांनी त्यांना साथ दिली. मध्य प्रदेश सरकारचा 'तानसेन पुरस्कार' मिळाल्याबद्दल राजीव पाटील आणि कल्याणी पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. पद्मविभूषण डॉ. एन. राजम यांच्या व्हायोलिन वादनाची रसिक आतुरतेने वाट पाहत होते.

त्यांच्या रंगमंचावर आगमन होताच टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करण्यात आले. राग देशने त्यांनी आपल्या वादनाची सुरुवात केली. अप्रतिम सादरीकरणातून त्यांनी रसिकांना स्वर्गीय आनंदाची अनुभूती दिली. रागिनी शंकर (व्हायोलिन) आणि पंडित अरविंद कुमार आझाद (तबला) यांनी त्यांना साथसंगत केली.

# जागतिक वन दिनी राज्यभर हरित संदेश

- **जंगल हे अन्न, पाणी, हवा आणि संस्कृती जपते - घैसास**
- **ग्रामीण भागात वृक्षसंवर्धनाची चळवळ; सुयश चॅरिटेबल ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक वन दिनानिमित्त "वने ही मानवी जीवनाचा श्वास आहेत" हा संदेश देत सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्रातील विविध भागांत व्यापक वृक्षसंवर्धन उपक्रम राबविण्यात आले. ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास, स्मिता घैसास तसेच कार्याध्यक्षा शलाका घैसास यांनी याबाबत माहिती दिली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जंगलांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे सांगताना त्यांनी वाढत्या प्रदूषणामुळे आणि वृक्षतोडीमुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधले. "प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन केले, तरच भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवा मिळेल," असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमाअंतर्गत पुणे, म्हसवाड, बीड, विंचुरवाडा, गडचिरोली आणि नंदुरबार या भागांमध्ये लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करून, वृक्षारोपण, पर्यावरण आणि जंगलांचे रक्षण कसे करायचे याची मोहीम राबविण्यात आली. विशेष म्हणजे, केवळ झाडे लावण्यापुरतेच न थांबता त्यांचे संगोपन आणि जतन करण्यावरही भर देण्यात आला. स्थानिक ग्रामस्थ, स्वयंसेवक आणि पर्यावरणप्रेमी यांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम प्रभावी ठरला. या वेळी लहानमूलांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती करण्यात आली. लहान मुलांनीही उत्साहाने सहभाग घेत "आजचे रोप उद्याचा श्वास" हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला. जंगल हे अन्न, पाणी, हवा आणि संस्कृती जपते. सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या या पुढाकारामुळे ग्रामीण भागातील वाडी, वस्ती, पाड्यांमध्ये हरित चळवळ उभी राहत असून पर्यावरण संवर्धनासाठी समाज एकत्र येण्याची गरज अधोरेखित झाली आहे. भविष्यातही अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याचा निर्धार ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# युवोन्मेश मैफिलीने रसिकांना मंत्रमुग्ध केले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विविध रागांनी नटलेले शास्त्रीय गायन, मन तल्लीन करणारी पखवाज वादनाची जुगलबंदी आणि रसिकांच्या टाळ्या-वाहव्यांच्या गजरात पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवातील 'युवोन्मेश' ही खास युवा कलाकारांची मैफिल रंगली. तरंगिनी सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि 'आपला परिसर' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २० व्या पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्राची सुरुवात गायिका डॉ. शर्वरी डिग्रजकर-पोफळे यांच्या सुरेल गायनाने झाली. त्यांनी राग गुजरी तोडीमध्ये विलंबित ख्याल आणि द्रुत बंदिश सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणाला गीत इनामदार, उमेश पुरोहित (तबला) आणि सुकन्या जोशी (तानपुरा) यांनी समर्पक साथ दिली. यावेळी बोलताना डॉ. शर्वरी डिग्रजकर-पोफळे म्हणाल्या, "या प्रतिष्ठित महोत्सवात सादरीकरणाची संधी मिळणे हे माझे भाग्य असून, हे पंडित जितेंद्र अभिषेकी यांचे आशीर्वादच आहेत." कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश रामदासी यांनी केले, तर रश्मी अभिषेकी यांनी प्रास्ताविक केले. त्या म्हणाल्या, "अभिजात संगीताचा प्रचार-प्रसार करण्यासाठी पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी मोठे योगदान दिले आहे.

# वासना, फसवणूक आणि रहस्यांचा थरारक खेळ

### हंगामा OTT वर 'जंग'ची दमदार एंट्री; पवित्रा पुनिया, जोहैब अश्रफ आणि आभास मेहता यांची प्रमुख भूमिका

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

हंगामा OTT ने आपली नवीन क्राईम-थ्रिलर मालिका 'जंग' प्रेक्षकांसाठी सादर केली असून, ही मालिका 18 मार्चपासून स्ट्रीमिंगसाठी उपलब्ध झाली आहे. गुजरातमधील अलंग शिप ब्रेकिंग यार्डच्या वास्तववादी पार्श्वभूमीवर आधारित ही कथा विश्वासघात, गुन्हेगारी आणि दडलेल्या रहस्यांचा थरारक प्रवास उलगडते. या मालिकेच्या केंद्रस्थानी कावेरी ही गृहिणी असून, तिचे आयुष्य वरकरणी साधे असले तरी ती वैवाहिक आयुष्यात अडकलेली असते. भावनिक आधाराच्या शोधात ती एका व्यक्तीसोबत संबंध प्रस्थापित करते;




मात्र हा संबंध लवकरच ब्लॅकमेलिंग आणि गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकतो. दरम्यान, तपासाची सूत्रे इन्स्पेक्टर सार्थक (जोहैब अश्रफ) यांच्या हाती येतात. तपास पुढे सरकत असताना धक्कादायक सत्य उलगडते. कावेरीचा पती बकुल (आभास मेहता) हा गुप्तपणे ड्रग साम्राज्य चालवत असतो आणि तिचाच वापर मोठ्या खेळात केला जातो. परिस्थिती टोकाला पोहोचल्यावर कावेरी स्वतःचा मार्ग निवडते आणि अलंग शिपयार्डमध्ये जीवघेण्या संघर्षाला सामोरी जाते, जिथे प्रत्येक निर्णय तिच्या आयुष्याला नवे वळण देतो.कावेरीची भूमिका साकारणाऱ्या पवित्रा पुनिया म्हणाल्या, "हे पात्र भावनिकदृष्ट्या खूप खोल आहे. एका असहाय स्त्रीपासून शक्तिशाली व्यक्ती बनण्याचा तिचा प्रवास प्रेक्षकांना नक्कीच भावेल." इन्स्पेक्टर सार्थकची भूमिका करणारे जोहैब अश्रफ म्हणाले, "ही मालिका प्रत्येक टप्प्यावर प्रेक्षकांना गुंतवून ठेवते. प्रत्येक ट्विस्टनंतर नवे रहस्य उलगडत जाते." तर आभास मेहता (बकुल) यांनी सांगितले, "बाहेरून साधा वाटणारा बकुल आतून खूप गुंतागुंतीचा आहे. सत्ता आणि सूडाच्या खेळात हे पात्र महत्त्वाची भूमिका बजावते." 'जंग' ही मालिका हंगामा OTT वर स्ट्रीमिंगसाठी उपलब्ध असून, टाटा प्ले बिंग, वॉचो, प्लेबॉक्स टीव्ही आणि एअरटेल एक्सस्ट्रीम प्ले यांसारख्या प्लॅटफॉर्मवरही पाहता येणार आहे.

# ग्लेनमार्ककडून GLIPIQ® (सेमाग्लूटाइड) भारतात लॉँच

### *टाइप-२ डायबिटीजसाठी परवडणारी GLP-1 थेरपी; साप्ताहिक खर्च ₹३२५ पासून*

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडने भारतात GLIPIQ® (सेमाग्लूटाइड) हे नवे औषध लॉँच केले आहे. टाइप-२ डायबिटीजच्या व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या GLP-1 थेरपीला परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देणे हा या लॉन्चमागील प्रमुख उद्देश आहे.

या औषधामुळे प्रगत इंजेक्शन थेरपीचा खर्च कमी होऊन अधिक रुग्णांना उपचार लवकर सुरू करण्याची संधी मिळणार आहे. GLIPIQ® चे साप्ताहिक उपचार खर्च ₹325 ते ₹440 दरम्यान असल्याने, या वर्गातील उपचार अधिक सुलभ आणि किफायतशीर ठरणार आहेत. GLIPIQ® हे वायल आणि प्री-फिल्ड पेन या दोन्ही स्वरूपात उपलब्ध आहे. वायल-आधारित फॉर्म्युलेशनमुळे डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली लवचिक डोसिंग शक्य होते, तर प्री-फिल्ड पेनमुळे रुग्णांना दीर्घकालीन उपचारासाठी स्वयं-डोसिंगची सुविधा मिळते. या औषधाला भारतातील बहु-केंद्रित फेज-३ क्लिनिकल ट्रायल्सनंतर CDSCO ची मान्यता मिळाली आहे. या अभ्यासांमध्ये भारतीय रुग्णांमध्ये औषधाची प्रभावीता आणि सुरक्षितता समाधानकारक असल्याचे दिसून आले आहे. ग्लेनमार्कने 'संकल्प' हा रुग्ण समर्थन कार्यक्रमही सुरू केला आहे. या माध्यमातून रुग्णांना उपचार सुरू करण्यासाठी मार्गदर्शन, इंजेक्शन थेरपीबाबत आत्मविश्वास आणि दीर्घकालीन पालनासाठी मदत केली जाणार आहे. ग्लेनमार्कचे अध्यक्ष (इंडिया फॉर्म्युलेशन्स) आलोक मलिक यांनी सांगितले, "डायबिटीजच्या प्रगत उपचारांमध्ये खर्च हा मोठा अडथळा ठरतो. GLIPIQ® द्वारे आम्ही परवडणाऱ्या किमतीत GLP-1 थेरपी उपलब्ध करून देत आहोत, ज्यामुळे अधिकाधिक रुग्णांना या उपचाराचा लाभ मिळेल." सेमाग्लूटाइड हे GLP-1 रिसेप्टर ॲगोनिस्ट असून, रक्तातील साखर नियंत्रणासोबतच स्थूलता, हृदयविकार आणि मूत्रपिंडाच्या आजारांमध्येही फायदेशीर मानले जाते.

# शेतकऱ्यांना सन्मान व प्रतिष्ठा मिळेपर्यंत लढा सुरूच राहील

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

"अन्नदाता शेतकरी आज चेष्टेचा, उपहासाचा विषय ठरला आहे. हाच शेतकरी जोवर सन्मानाचा, प्रतिष्ठेचा विषय होत नाही, तोवर आमचा लढा आणि संघर्ष सुरूच राहील," असे प्रतिपादन माजी खासदार आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केले. शेतीव्यवसायात बुवाबाबांचा शिरकाव, मंत्रतंत्राचा वापर चीड आणणारा असल्याचेही सांगून मंत्रा-तंत्राने शेती यशस्वी झाली असती, तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असत्या का? असा सवालही शेट्टी यांनी उपस्थित केला. सरहद पुणे आणि कृष्णा पब्लिकेशन यांच्या वतीने आयोजित शहीद भगतसिंह यांच्या पुतणीने लिहिलेल्या 'युगद्दष्टा भगतसिंह आणि त्यांचे मृत्युंजयी पूर्वज' या भगतसिंह यांच्या अधिकृत जीवनचरित्राचे प्रकाशन व शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या राजू शेट्टी यांना 'युगद्दष्टा भगतसिंह राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान सोहळ्यात शेट्टी यांना भगतसिंह यांचे पुतणे व विचारवंत किरणजितसिंह यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# एआय प्लस स्मार्टफोनची मोठी भागीदारी

- **मुंबई इंडियन्स आणि KKR चे अधिकृत पार्टनर**
- **IPL हंगामात चाहत्यांना खास अनुभवांची मेजवानी**




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

एआय प्लस स्मार्टफोनने आगामी टी२० हंगामासाठी मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाइट रायडर्स या दोन आघाडीच्या आयपीएल संघांसोबत अधिकृत स्मार्टफोन पार्टनर म्हणून करार केला आहे.

या भागीदारीमुळे एआय प्लस ब्रँडला देशभरातील लाखो क्रिकेट चाहत्यांशी थेट जोडण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये चाहत्यांना खेळाडूंना भेटण्याची संधी, सामन्यांची तिकिटे, स्वाक्षरी केलेले मर्चेंडाईज आणि एक्सक्लुझिव्ह कंटेंट यांसारखे अनुभव मिळणार आहेत.

एआय प्लस स्मार्टफोनचे सीईओ माधव शेठ यांनी सांगितले की, "क्रिकेट हे लोकांना एकत्र आणणारे माध्यम आहे. या भागीदारीमुळे आम्हाला चाहत्यांशी अधिक जवळून जोडता येईल आणि तंत्रज्ञान व उत्साह यांचा संगम घडवता येईल."

मुंबई इंडियन्सच्या प्रवक्त्यांनीही या सहकार्याचे स्वागत करत, आधुनिक चाहत्यांच्या अपेक्षांनुसार तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक उत्तम अनुभव देण्यावर भर दिला. तर कोलकाता नाइट रायडर्सच्या अधिकाऱ्यांनी या भागीदारीमुळे चाहत्यांसोबतचे नाते अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या सहकार्याद्वारे एआय प्लस स्मार्टफोन टीम प्लॅटफॉर्म, फॅन एंगेजमेंट आणि डिजिटल ॲक्टिव्हेशन्समध्ये सक्रिय सहभाग घेणार असून, संपूर्ण हंगामभर चाहत्यांसाठी नवीन अनुभव निर्माण केले जाणार आहेत.

एकूणच, या भागीदारीमुळे एआय प्लस स्मार्टफोनने तंत्रज्ञान, क्रीडा आणि संस्कृतीच्या संगमावर आपली उपस्थिती अधिक मजबूत केली आहे.

## सेप्ट युनिव्हर्सिटीकडून मास्टर्स इन फर्निचर डिझाईनसाठी प्रवेश जाहीर

CEPT UNIVERSITY

- ३१ मार्चपर्यंत अर्जाची मुदत; डिझाईन क्षेत्रातील करिअरसाठी नवी संधी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
सेप्ट युनिव्हर्सिटीने मास्टर्स इन फर्निचर डिझाईन (MFD) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेची घोषणा केली आहे. डिझाईन क्षेत्रातील पुढील पिढीचे व्यावसायिक आणि उद्योजक घडविणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असून, नोंदणी ३१ मार्च २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत फर्निचर केवळ उपयुक्ततेपुरते मर्यादित न राहता, काम करण्याच्या आणि संवाद साधण्याच्या पद्धतीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या पार्श्वभूमीवर सेप्टचा एमएफडी कार्यक्रम विद्यार्थ्यांना रचनात्मकता आणि तांत्रिक कौशल्य यांचा संगम साधण्याची संधी देतो.

या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना साहित्य, उत्पादन प्रक्रिया, प्रोटोटायपिंग, अर्गोनॉमिक्स आणि डिझाईनचे बारकावे प्रत्यक्ष अनुभवातून शिकवले जातात. तसेच उद्योगातील आर्थिक आणि व्यावसायिक पैलूंवरही भर दिला जातो. सेप्टची 'स्टुडिओ युनिट' शिक्षणपद्धती हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असून, छोट्या गटांमध्ये प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सखोल शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना उद्योगाशी संबंधित प्रकल्प, कार्यशाळा आणि डिझाईन स्टुडिओच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभव मिळतो. याशिवाय, विद्यार्थ्यांना उत्पादन कारखाने, प्रदर्शने, व्यापार मेळे यांना भेट देण्याची संधी मिळते. उद्योगातील तज्ज्ञ आणि व्यावसायिकांशी संवाद साधण्यामुळे त्यांच्या करिअरच्या संधी अधिक मजबूत होतात. कार्यक्रम प्रमुख कौलव भगत यांनी सांगितले की, "भारतातील फर्निचर उद्योग वेगाने बदलत असून, नाविन्यपूर्ण आणि शाश्वत डिझाईनची मागणी वाढत आहे. या क्षेत्रात सर्जनशीलतेने काम करणाऱ्या डिझायनर्ससाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत."

सेप्ट युनिव्हर्सिटीमध्ये सुसज्ज कार्यशाळा, विस्तृत ग्रंथालय आणि सहयोगी स्टुडिओ वातावरण उपलब्ध असून, इच्छुक विद्यार्थ्यांसाठी हे एक आदर्श शिक्षण केंद्र ठरत आहे.

# मातीशी नातं जपणारा जिद्दी चेहरा

## पै. युवराजशेठ जाधव यांचा प्रेरणादायी प्रवास



**वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष**
**श्री. लक्ष्मण साबळे, निवासी संपादक**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
काही व्यक्ती केवळ नावापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्यांच्या कृतीतून आणि विचारातून समाजात प्रेरणेचा दीप प्रज्वलित करतात. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे पै. युवराजशेठ जाधव. मातीशी घट्ट नातं, मनात माणुसकी आणि डोळ्यांत मोठी स्वप्नं बाळगणाऱ्या युवराजशेठ यांचा वाढदिवस निमित्ताने त्यांच्या कार्याचा आढावा घेताना अनेक पैलू उजेडात येतात.

नऱ्हे-वडगाव परिसरात कुणालाही अडचण आली, तर सर्वप्रथम आठवण येते ती युवराजभाऊंची. कारण ते फक्त एक कार्यकर्ते नाहीत, तर "आपलं माणूस" म्हणून ओळखले जातात. शेतकरी कुटुंबात वाढलेल्या युवराज यांनी लहानपणापासूनच संघर्ष अनुभवला. शेतीतील कष्ट, उन्हातान्हातले दिवस आणि कुस्तीच्या मैदानातील घाम. यातूनच त्यांनी आयुष्याचे खरे धडे घेतले.

कुस्ती हा त्यांचा केवळ छंद नसून त्यांची ओळख बनली आहे. आज ते राष्ट्रीय तालीम संघ, पुणेचे सदस्य म्हणून कार्यरत असून, अनेक तरुणांना क्रीडाक्षेत्रात घडवण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करत आहेत. सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि क्रीडा क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान लक्षणीय आहे.

राजकीय क्षेत्रातही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत भारतीय जनता पार्टीच्या खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. या प्रवासात त्यांना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आ. भीमराव तापकीर आणि विलास कथूरे सर यांच्या नेतृत्वाखाली आगामी काळामध्ये कार्यरत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कोरोनासारख्या संकटकाळात त्यांनी दाखवलेली सेवाभावाची वृत्ती विशेष उल्लेखनीय आहे. अन्न, औषध किंवा इतर कोणत्याही मदतीची गरज असलेल्या नागरिकांसाठी ते नेहमीच पुढे सरसावले. त्यांच्या दृष्टीने समाजसेवा ही प्रसिद्धीसाठी नसून एक कर्तव्य आणि जबाबदारी आहे.

अध्यात्मिक दृष्टिकोनातूनही त्यांना संत बाळूमामा यांच्या विचारांचा प्रभाव लाभला आहे. "संकटांना घाबरू नका, जिद्द ठेवा," हा संदेश त्यांनी आपल्या जीवनात उतरवला आहे.

परंपरा आणि संस्कृती जपण्याबाबतही त्यांची भूमिका ठाम आहे. बैलपोळा हा सण ते दरवर्षी उत्साहात साजरा करतात. बैलांची सजावट, पूजा आणि ढोल-ताशांच्या गजरात साजरा होणारा हा उत्सव त्यांच्या शेतकरी अस्मितेचे प्रतीक आहे.

युवराजशेठ जाधव म्हणजे जिद्द, माणुसकी आणि निस्वार्थ सेवेचं जिवंत उदाहरण. त्यांच्या वाढदिवसानिमित्त समाजातील सर्व स्तरांतून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्यांच्या कार्याला अधिक बळ मिळावे आणि त्यांनी उंच भरारी घ्यावी, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### कॅपिटालँडचा होप स्कूल प्रोग्राम विस्तार; १,४०० विद्यार्थ्यांना लाभ

- फेज २ पूर्ण; भारतभर ३,००० हून अधिक मुलांच्या शिक्षणाला चालना

पुणे (आरंभ पर्व) : कॅपिटालँड होप फाउंडेशनने पुण्यातील होप स्कूल प्रोग्रामच्या दुसऱ्या टप्प्याची (फेज २) पूर्तता केली असून, या विस्तारामुळे आता १,४०० हून अधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. या टप्प्याचे उद्घाटन कॅपिटालँड इन्व्हेस्टमेंट इंडियाचे अध्यक्ष किशोर मोरजानी, भोरवाडी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नंदकुमार भोर आणि कॅपिटालँडच्या कर्मचारी स्वयंसेवकांच्या उपस्थितीत करण्यात आले. या विस्ताराअंतर्गत हिंजवडीजवळील भोरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत १२,००० चौ.फुट क्षेत्रात १९ नवीन वर्गखोल्या उभारण्यात आल्या आहेत. यापूर्वी २०२३ मध्ये पूर्ण झालेल्या पहिल्या टप्प्यात शाळेचे नूतनीकरण, स्वच्छतागृहे, वाचनालय, संगणक व विज्ञान प्रयोगशाळा उभारण्यात आल्या होत्या. या नव्या टप्प्यामुळे शाळेची क्षमता वाढली असून, आता ७६० अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश देणे शक्य झाले आहे. सुसज्ज वर्गखोल्या, आधुनिक साधने आणि सुधारित पायाभूत सुविधांमुळे विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित आणि अनुकूल वातावरण मिळत आहे. कॅपिटालँड होप फाउंडेशन (इंडिया) चे संचालक गौरी शंकर नागभूषणम म्हणाले, "पुण्यातील स्थानिक समुदायाच्या शिक्षण आणि विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कर्मचारी स्वयंसेवक आणि भागीदारांच्या मदतीने विद्यार्थ्यांसाठी अधिक समृद्ध शैक्षणिक वातावरण निर्माण होत आहे." होप स्कूल प्रोग्रामद्वारे कॅपिटालँड सध्या बेंगळुरू, हैदराबाद, चेन्नई आणि पुणे येथे मिळून ३,००० हून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत पुरवत आहे.



### चेटीचंड महोत्सवात सिंधी संस्कृतीचा रंगतदार आविष्कार

पुणे (आरंभ पर्व) : 'आयो लाल झुलेलाल'च्या जयघोषात भगवान साई झुलेलाल यांचा १०७६ वा जन्मोत्सव आणि सिंधी नववर्षाचा चेटीचंड महोत्सव पुण्यात उत्साहात साजरा करण्यात आला. सिंधू सेवा दलातर्फे आयोजित या सोहळ्यात ५ हजारांहून अधिक नागरिकांनी सहभाग घेत सिंधी संस्कृती आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडवले. येरवड्यातील डेक्कन कॉलेजच्या बँक्वेट हॉल व मैदानावर झालेल्या या महोत्सवाची सुरुवात भगवान साई झुलेलाल यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर भजन, आरती, सिंधी गीतांची मैफल, आकर्षक नृत्याविष्कार आणि महाप्रसादामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. या वर्षीच्या महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे महिलांचा म्युझिक बँड ठरला. विविध शहरांतील १६ सिंधी महिला कलाकारांनी एकत्र येत गायन, वादन आणि सादरीकरणातून 'नारी शक्ती'चा प्रभावी संदेश दिला. तसेच जनरेशन नेक्स्ट डान्स अकादमीने सादर केलेल्या नृत्यप्रयोगाने उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन व अभिनेता मोहित शेवानी यांनी केले. त्यांच्या विनोदी शैलीने कार्यक्रमात रंगत आणली. या वेळी न्यूज १८ चे व्यवस्थापकीय संचालक किशोर आजवानी यांच्या हस्ते साई झुलेलाल यांची महाआरती करण्यात आली, तर उद्योजक मनोज मोटवानी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला सिंधू सेवा दलाचे अध्यक्ष सचिन तलरेजा, माजी अध्यक्ष सुरेश जेठवानी, अशोक वासवानी, दीपक वाधवानी, विजय दासवानी, सचिव राजेंद्र फेरवानी, खजिनदार जय पिंजानी आणि जनसंपर्क अधिकारी देवेंद्र चावला आदी मान्यवर उपस्थित होते.


## ग्राम पंचायत कार्यालय खोरवडी ता. दौड जि. पुणे.

### ग्राम पंचायत कर्मचारी पद भरती जाहिरात

दिनांक :- २०/०३/२०२६

१. महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ६१
२. मुंबई ग्रामपंचायत नोकरांबाबत (सेवेच्या शर्ती) नियम, १९६०
३. शासन परिपत्रक क्र. व्हिपीएम २६८९/२२९७/२१, मंत्रालय, मुंबई दि. २९ डिसेंबर १९८९
४. ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६९९/प्र.क्र.२०६ (१)/२१, दि. २१ जानेवारी २०००
५. ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. ग्रापक २००५/प्र.क्र. १४/पंरा-५ दि. २२ मार्च २००५
६. ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम-२००८/प्र.क्र. ११/पंरा-३, ०५ ऑगष्ट २००८
७. ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम-१०१३/प्र.क्र. ६०/पंरा-३ दि. ०८ जुलै २०१३
८. ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम-२०१३/प्र.क्र. २४३/पंरा-३. दि. ३० ऑक्टोबर २०१३
९. शासन निर्णय क्र. प्रानिमं १२१५/(प्र.क्र.१०९/१५)/१३-अ दि. ५ आक्टोबर, २०१५
१०. ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम-२०१८/प्र.क्र. ३९७/पं.रा.-३ दि. १७ सप्टेंबर २०१८
११. ग्राम पंचायत कार्यालय, खोरवडीची सभा दिनांक १२/३/२०२६ ठराव क्र. ४/१

सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, ग्रामपंचायत खोरवडीसाठी एक सेवक/पाणीपुरवठा नोकर/ लिपिक पद मंजूर असून, हे पद रिक्त आहे तेव्हा दिनांक १२/०३/२०२६ रोजी झालेल्या सभेतील मान्यतेनुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील कलम ६१ प्रमाणे प्राप्त अधिकारात सदरील पदाच्या निवडीसाठी इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील अटी व शर्तींच्या निकषात बसणाऱ्या इच्छुकांनी आपले अर्ज विहित कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावेत.

• अर्ज करण्याची पध्दत :-

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुत पदा करीता फक्त लेखी स्वरूपात (ऑफलाईन पध्दतीने ) अर्ज स्विकारण्यात येतील. |
| २ | पात्र उमेदवारांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज हे दिनांक २०/३/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजेपासून ते दिनांक २६/३/२०२६ रोजी सांयकाळी ०५:०० वाजेपर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह ग्राम पंचायत कार्यालयात जमा करावेत. |
| ३ | वरील विहित कालावधीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. |

या कर्मचारी भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात ग्राम पंचायत कार्यालय खोरवडी येथील सूचना फलकावर चिकटवलेली असून उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपुर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून अर्ज सादर करावेत. तसेच भरती प्रक्रिया संबंधित प्रक्रियेसाठी आवश्यक व अद्यावत माहितीसाठी नियमितपणे सूचना फलक पाहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

भरती प्रक्रिया स्थगित करणे किंवा रद्द करणे, तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण तथा ग्राम पंचायत कार्यालय खोरवडी ता. दौंड यांना असतील.

ग्राम पंचायत कार्यालय खोरवडी ता. दौंड अंतर्गत कर्मचारी भरती - २०२६ अन्वये भरावयाच्या पदांचे नाव, रिक्त पद संख्या सामाजिक आरक्षण इत्यादींचा एकत्रित तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | भरावयाच्या पदांची संख्या | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | पाणीपुरवठा सेवक (वर्ग-४) - अर्ध कुशल | | पद आरक्षित नाही. |
| २. | लिपीक (वर्ग-३) कुशल | | पद आरक्षित नाही. |

• पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता

| अ. क्र. | पदाचे नाव | किमान शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|
| १. | पाणीपुरवठा सेवक (वर्ग-४) | प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा मातृभोषेतील व्हर्नाक्युलर ७ वी, परिक्षा पास असलेले प्रमाणपत्र किंवा मान्यता प्राप्त प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेच्या प्राधिकाऱ्याने ७ वी ची परिक्षा झाल्याबद्दलचे शालांत परिक्षा प्रमाणपत्र. | |
| २. | लिपीक (वर्ग-३) | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (एच. एस. सि.) परीक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष (१० + २) पदविका प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण | पाणीपुरवठा योजना चालविणे बाबत तांत्रिक माहिती /अनुभव आवश्यक |

• वयोमर्यादा

अ) अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास कोणत्याही उमेदवारांचे वय १८ वर्ष पेक्षा कमी नसावे.
ब) सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विहित वरची वयोमर्यादेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | आरक्षण/समांतर आरक्षण | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १. | खुल्या प्रवर्गातील उमेदवार | २८ वर्ष |
| २. | मागासवर्गीय उमेदवार | ३३ वर्ष |

• वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| अ) लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील तरतुदींनुसार विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व तदनंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार ग्रामपंचायत सेवेच्या नियुक्तीसाठी अनrh अनरहत ठरविण्यास पात्र होईल. |
| आ) उमेदवार स्थानिक ग्राम पंचायत क्षेत्रातील रहिवाशी असावा. | उमेदवार हा स्थानिक ग्राम पंचायत क्षेत्रातील रहिवाशी असावा. निवासाचा पुरावा आवश्यक (जर ग्राम पंचायत क्षेत्रातील अर्ज प्राप्त झाले नाही तर पंचक्रोशीतून आलेल्या उमेदवाराचा अर्ज विचारात घेतला जाईल.) |

• अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सूचना :-

| | |
|---|---|
| १ | उमेदवाराने विहित नमुन्यात व स्वतःच्या हस्ताक्षरात सुवाच्यपणे अर्ज भरावा, अर्जासोबत नजिकच्या काळातील रंगीत पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवावा. |
| २ | अर्जात उमेदवाराचे नाव, वडीलांचे नाव / पतीचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्त्रमादनांक, धर्म, जात, पोटजात, भ्रमरध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मूलभूत माहिती आहे. जी उमेदवारानी सविस्तर द्यावी. |
| ३ | उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार नमूद करावा. उदा. कायमस्वरूपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. माहिती अचूक भरावी. |
| ४ | मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सत्यप्रत सोबत जोडावी. |
| ५ | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. |
| ६ | उमेदवाराने अर्जासोबत अनूभव दाखला असल्यास पूरावा सोबत जोडावा. |
| ७ | उमेदवाराने अर्जासोबत कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. |

• विशेष सूचना

| | |
|---|---|
| १ | कामाचे स्वरूप :- कर वसूली, शुध्द पाणी पुरवठा, ग्राम स्वच्छतेची सर्व कामे, दिवाबत्ती व्यवस्था, दंवडी देणे इ. व वेळोवळी ग्राम पंचायत आदेशीत करील ते ईतर सर्व कामे करणे बंधनकारक राहील. |
| २ | वेतन :- शासन निर्णयानुसार किमान वेतनाप्रमाणे ग्रामपंचायत ठरवील त्यानुसार वेतन व राहणीमान भत्ता देय राहील. |
| ३ | चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहणार नाही. कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. |
| ४ | निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकिय तपासणी करण्यात येईल. वैद्यकिय अहवाल प्रतिकूल असल्यास केलेली निवड व नेमणूक रद्द करण्यात येईल. |
| ५ | निवड झालेल्या उमेदवाराने आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र मूळ प्रतीची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. |
| ६ | पात्र उमेदवार यांना शैक्षणिक पात्रतेनुसार गुण देण्यात येतील व गुणानुक्रमे प्रथम ३ उमेदवार यांचा नेमणुकीसाठी विचार केला जाईल व त्यांच्यापैकी एकाची निवड करण्याचा अंतिम निर्णय ग्रामपंचायत घेईल. |

• सर्वसाधारण सूचना

उमेदवारांनी अर्ज सादर करीत असताना अर्जासोबत फक्त कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती सोबत जोडाव्यात. अर्जासोबत कोणतेही मूळ कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. कागदपत्र पडताळणीच्या प्रक्रियेवेळी पदांकरिता आवश्यक मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खोरवडी
ता. दौड जि. पुणे.

सही/-
प्रशासक
ग्रामपंचायत खोरवडी
ता. दौड जि. पुणे.

• प्रत प्रसिद्धीस्तव-
१. ग्राम पंचायत नोटीस बोर्ड
२. ग्राम पंचायत कार्यक्षेत्रातील सार्वजनिक ठिकाणी
३. स्थानिक वृत्तपत्र

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खोरवडी
ता. दौड जि. पुणे.

सही/-
प्रशासक
ग्रामपंचायत खोरवडी
ता. दौड जि. पुणे.

• अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्रांची सूची
१. विहित नमुन्यातील अर्ज
२. स्थानिक रहिवाशी असल्याबाबतचे प्रमाणपत्र
३. शाळा सोडल्याचा दाखला
४. प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा मातृभोषेतील व्हर्नाक्युलर ७ वी, परिक्षा पास असलेले प्रमाणपत्र किंवा मान्यता प्राप्त प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेच्या प्राधिकाऱ्याने ७ वी ची परिक्षा झाल्याबद्दलचे शालांत परिक्षा प्रमाणपत्र / गुणपत्रक मुळ प्रत
५. इतर शैक्षणिक प्रमाणपत्र
६. छायाचित्र ओळख पुरावा (आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र इ.)
७. उमेदवाराचे नजिकच्या कालावधीतील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (दोन प्रती)


## थोडक्यात पण महत्वाचे



## डायकिन इंडियाकडून एआय आधारित ‘व्हीआरव्ही अल्फा’एसी श्रेणी सादर

- ऊर्जा कार्यक्षमता, स्मार्ट तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपायांवर भर; शोजो अँडो यांची पत्रकार परिषदेत माहिती

पुणे (आरंभ पर्व) : डायकिन एअरकंडिशनिंग प्रा. लिमिटेडने २०२६ सालासाठी आपल्या नव्या एअर कंडिशनिंग उत्पादन श्रेणीचे अनावरण करत कूलिंग क्षेत्रात महत्त्वाची झेप घेतली आहे. या नव्या श्रेणीत ऊर्जा कार्यक्षम रूम एसी मॉडेल्ससोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित ‘व्हीआरव्ही अल्फा’ मालिका सादर केली आहे. या नव्या श्रेणीमध्ये ऊर्जा कार्यक्षमता, स्मार्ट तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपायांवर भर दिला आहे, अशी माहिती डायकिन इंडियाचे उपव्यवस्थापकीय संचालक शोजो अँडो यांनी पत्रकार परिषदेत दिली. सेनापती बापट रस्त्यावरील हॉटेल जेडब्ल्यू मेरीयटमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेवेळी संचालक व वरिष्ठ उपाध्यक्ष संजय गोयल, पश्चिम विभागीय वरिष्ठ उपाध्यक्ष उल्हास शर्मा व ऑपरेशन्स हेड (महाराष्ट्र व गोवा) उपस्थित होते.



## जांभूळवाडी दरी पुलावर मध्यरात्री अपघात; ३ ते ४ वाहनांचे मोठे नुकसान

पुणे (आरंभ पर्व) : कात्रज परिसरातील जांभूळवाडी दरी पुलावर मध्यरात्री भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. या अपघातात तब्बल तीन ते चार वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मिळालेल्या माहितीनुसार, भरधाव वेग आणि नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेत तीन जण किरकोळ जखमी झाले असून त्यांना तात्काळ जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर काही काळ या मार्गावर वाहतूक विस्कळीत झाली होती. स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जांभूळवाडी दरी पुल परिसर हा वारंवार अपघात घडणारा ठिकाण म्हणून ओळखला जात असून, या घटनेमुळे पुन्हा एकदा रस्ते सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## डोणजे गावात संत बाळूमामा यांच्या मेंढामंडळीचे भव्य दर्शन सोहळा संपन्न



डोणजे (आरंभ पर्व) : संत बाळूमामा यांच्या भव्य दिव्य मेंढामंडळीचे दर्शन सोहळा आज डोणजे गावात मोठ्या भक्तिभावाने पार पडला. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास मेंढामंडळी गावात दाखल होताच “बाळूमामा की जय” च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या अनोख्या धार्मिक सोहळ्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. महिला, पुरुष, युवक तसेच लहान मुलांनी उत्साहाने दर्शन घेतले. अनेक भाविकांनी मनोभावे प्रार्थना करून नवस व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन महेश वाल्हेकर यांच्या शेतात करण्यात आले होते. स्थानिक ग्रामस्थांनी उत्तम नियोजन करत कार्यक्रम शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडला. भाविकांच्या मते, संत बाळूमामांच्या मेंढामंडळीचे दर्शन घेणे अत्यंत पवित्र मानले जाते. या दर्शनामुळे घरात सुख-समृद्धी येते, अशी श्रद्धा असल्याने दरवर्षी या सोहळ्याची मोठी उत्सुकता असते. या कार्यक्रमामुळे डोणजे गावात दिवसभर भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते.

## जमिनीच्या नोंदी व मोजणी प्रक्रियेला वेग; मोठा कायापालट




पुणे (आरंभ पर्व) : राज्यातील जमिनीच्या कायदेशीर नोंदी व मोजणी प्रक्रिया अधिक वेगवान आणि पारदर्शक करण्यासाठी महसूल विभागाच्या अधिपत्याखालील भूमिअभिलेख विभागात मोठा कायापालट करण्यात येत आहे. याअंतर्गत राज्यभरात तब्बल ४९ नवीन कार्यालये स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिली असून, त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. नवीन सुधारित आकृतिबंधानुसार भूमिअभिलेख विभागाची यंत्रणा अधिक सक्षम करण्यात येणार आहे. यामध्ये नांदेड येथे एक उपसंचालक भूमिअभिलेख कार्यालय स्थापन होणार आहे. तसेच नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अहिल्यानगर, नाशिक, पुणे आणि मुंबई उपनगर येथे ८ नवीन जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख कार्यालये सुरू करण्यात येणार आहेत. याशिवाय कोकण विभाग, नाशिक विभाग, अमरावती विभाग, नागपूर विभाग आणि पुणे विभागांत २३ नवीन नगर भूमापन अधिकारी कार्यालये उभारली जाणार आहेत. तसेच ५ विशेष उपअधीक्षक कार्यालये आणि १२ चौकशी अधिकारी कार्यालयांना देखील मंजुरी देण्यात आली आहे. या व्यापक पुनर्रचनेमुळे जमीन मोजणी, नोंदी दुरुस्ती आणि मालमत्ता संबंधित प्रक्रिया अधिक गतिमान होणार असून, प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यास मदत होणार आहे. परिणामी, नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या कमी माराव्या लागतील आणि सेवा अधिक सुलभ व पारदर्शक होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



## आरएमबी पिंपरी-चिंचवडतर्फे महिला उद्योजिकांचा सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महिला दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असताना आरएमबी पिंपरी-चिंचवडच्या वतीने १५ महिला उद्योजिकांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला आरएमबी पिंपरी-चिंचवडचे अध्यक्ष श्रीकांत मडघे, उपाध्यक्ष सुनील जोशी, तसेच प्रमुख पाहुणे संदीप बेलसरे (अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना) यांच्यासह विविध क्षेत्रांतील सुमारे ५५ उद्योजक उपस्थित होते. यावेळी बोलताना संदीप बेलसरे यांनी महिला लघुउद्योग क्षेत्रात भरीव कामगिरी करत असल्याचे सांगितले. तर श्रीकांत मडघे यांनी महिला मुळातच सक्षम असतात, त्यांच्या कार्याचा सन्मान करणे आवश्यक असून त्यामुळे अधिकाधिक महिला उद्योग क्षेत्रात पुढे येतील, असा विश्वास व्यक्त केला.

## स्वामी महाराज प्रकट दिनानिमित्त कार्यक्रम उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे, मानाजी नगर येथील जिजाई व्हीला परिसरात श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

प्रभाग क्रमांक ३४ चे भाजप प्रभाग अध्यक्ष राजूदादा कुटे तसेच भाजपा महिला मोर्चाच्या शहर उपाध्यक्ष कोमल सतीश कुटे यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, नगरसेवक हरिदास चरवड, राजेभाऊ लायगुडे, जयश्री भूमकर, कोमल नवले, धनश्री कोल्हे, माजी सरपंच पोपटराव खेडेकर, माजी उपसरपंच सतीश कुटे, राजाभाऊ वाडेकर,सुशांत कुटे, अक्षय इंगळे, शिवसेना जिल्हा युवासेना



प्रमुख सोमनाथभाऊ कुटे, प्रदीप कुटे अमोल कुटे, तेजस कुटे, विनायक कुटे, नारायण इंगळे, अजित कुटे, अक्षय कुटे, जीवन कुटे, विशाल निबाळकर, ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेशबापू गायकवाड, अनिल मते, विजय मते, निवेदक राज शिनारे, निलेश लांडगे, सदाशिव कुटे, अथर्व खेडेकर, अथर्व आंग्रे, प्राज भिलारे, समीर कुटे, मनोहर कुटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान भजन, पूजन व प्रसाद वितरणाचे आयोजन करण्यात आले. उपस्थितांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवत स्वामी समर्थांच्या नामस्मरणात तल्लीन झाले. यावेळी बोलताना धीरज घाटे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकोपा वाढतो आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे मत व्यक्त केले.

## स्वामी प्रकट दिनानिमित्त भक्तीमय वातावरणात कार्यक्रम संपन्न





**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

मानाजी नगर, नऱ्हे येथील कृष्ण गंगा व्हिला सोसायटीमध्ये स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. यावेळी अंध-अपंग सामाजिक संस्थेच्या कलाकारांचा भजन व भक्ती गीतांचा विशेष कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला. सोसायटीतील सर्व सदस्यांच्या एकजुटीने आणि उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. उपस्थित नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत भक्तीभाव व्यक्त केला. तसेच महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाभ अनेक भाविकांनी घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन सोसायटी सभासद प्रसिद्ध निवेदक राज शिनारे, नितीन कुरणे, किरण महाबोले, राजेश कदम, मच्छिंद्र बहिरे, सुनील पांढरे, केतन भोसले, ओंकार गाडगे, मनोज बोरसे, अंकुश कोकरे ,गणेश म्हैसे तसेच इतर सर्व सभासदांनी केले. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. तसेच या निमित्ताने नर्हेगावचे मा. उपसरपंच सतीश कुटे हे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व सदस्यांचे विशेष कौतुक करत त्यांचा सन्मानही यावेळी करण्यात आला. सर्वांच्या सहकार्यामुळे हा सोहळा अधिकच संस्मरणीय ठरला.

## धीरज घाटे यांच्या वाढदिवसानिमित्त तिरुपती बालाजी मूर्ती भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर भाजपाचे अध्यक्ष तथा नगरसेवक धीरज घाटे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या विशेष दिवशी पुणे भाजप ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष रमेशबापू गायकवाड यांनी श्री क्षेत्र तिरुमला तिरुपती बालाजी यांची सुंदर मूर्ती सप्रेम भेट देऊन घाटे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी भाजपा मंडलअध्यक्ष विजयभाऊ मते, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते यांच्यासह ओबीसी मोर्चाचे माजी अध्यक्ष नामदेव भाऊ माळवदे, आप्पा घनवट आणि इतर मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत धीरज घाटे यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांना पुढील




वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. रमेशबापू गायकवाड यांनी दिलेली तिरुपती बालाजी मूर्ती ही श्रद्धा आणि सन्मानाचे प्रतीक असून, या भेटीद्वारे त्यांनी घाटे यांच्याप्रती आदर व्यक्त केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही सप्रेम भेट देऊन शुभेच्छा व्यक्त करत वातावरण उत्साहपूर्ण केले.



## बोपोडीत ईदनिमित्त उपमहापौर परशुराम वाडेकर यांची उपस्थिती

**दापोडी (दै. आरंभ पर्व)**

पवित्र ईद सणाच्या निमित्ताने बोपोडी परिसरात बंधुभाव आणि सौहार्दाचे दर्शन घडले. बोपोडी येथील बोपोडी जामा मस्जिद येथे भेट देत पुणे महापालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत त्यांनी ईदच्या आनंदात सहभागी होण्याचा मान मिळाल्याचे सांगितले. तसेच जमाबंदीचे अध्यक्ष व ट्रस्टी यांनी केलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. “आपुलकीने केलेला सन्मान सदैव प्रेरणादायी ठरतो,” असे ते म्हणाले. यानंतर खडकी ईदगाह मैदान येथेही भेट देत त्यांनी तेथील मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बोलताना वाडेकर यांनी, “आपसातील बंधुभाव, एकता आणि सौहार्द यामुळे समाज अधिक मजबूत होतो,” असे सांगत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. ईदचा हा पवित्र सण सर्वांच्या जीवनात आनंद, शांतता आणि समृद्धी घेऊन येवो, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.


## जुलैपर्यंत भिडे वाडा स्मारक पूर्णत्वास; ६५ टक्के काम पूर्ण!!

### निलेश गिरमे यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळाची वर्षपूर्ती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्त्री शिक्षणाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेल्या ऐतिहासिक भिडे वाडा स्मारकाच्या कामाला वेग आला असून सध्या सुमारे ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांपैकी एक असलेल्या या प्रकल्पासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून काम अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे.

महात्मा फुले व भिडे वाडा राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष निलेश राधिका ताई दशरथ गिरमे यांनी नुकतीच या प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच



गतीबाबत समाधान व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना काम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. दैनिक आरंभपर्वशी संवाद साधताना गिरमे यांनी सांगितले की, साईटवरील स्ट्रक्चरचे काम मोठ्या प्रमाणात पूर्ण झाले असून उर्वरित कामही जलद गतीने सुरू आहे. येत्या जुलै महिन्यापर्यंत हे स्मारक पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे आणि त्यासाठी सर्व यंत्रणा समन्वयाने काम करत आहेत. दरम्यान, युवासेना शहरप्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या निलेशभाऊ गिरमे यांच्या महाराष्ट्र शासनाच्या समिती अध्यक्षपदाच्या निवडीला एक वर्ष पूर्ण झाले आहे. या कालावधीत त्यांनी या प्रकल्पाला गती देत विक्रमी वेळेत काम पुढे नेले असल्याचे दिसून येते. त्यांची शिफारस सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. भिडे वाडा हे मुलींच्या पहिल्या शाळेचे ऐतिहासिक ठिकाण असल्याने या स्मारकाला विशेष महत्त्व आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर पुण्याच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक वारशात मोलाची भर पडणार असून भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे.

## ...आता ‘आंदोलनातून आलेले’ नेतृत्व हवे

### तृप्ती ताई देसाईच योग्य पर्याय!

### अभिषेक मरगळे । मार्केटिंग हेड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतात महिलांवर होणारे अत्याचार, अन्याय आणि भेदभाव अजूनही थांबलेले नाहीत. रोज नवे प्रकरण समोर येते, आवाज उठतो, पण कारवाई मात्र संथच राहते. अशा परिस्थितीत महिला **आयोगासारख्या महत्त्वाच्या संस्थेच्या नेतृत्वात** फक्त पदभूषा करणारे नव्हे, तर लढणारे, भिडणारे आणि निर्णय घेणारे नेतृत्व असणे काळाची गरज बनली आहे.

याच पार्श्वभूमीवर एक नाव ठळकपणे पुढे येते. तृप्ती ताई देसाई.

तृप्ती ताईंनी केवळ भाषणे दिली नाहीत, तर रस्त्यावर उतरून लढा दिला आहे. मंदिर प्रवेश आंदोलन असो किंवा महिलांच्या सन्मानाचा प्रश्न. त्या नेहमीच संघर्षाच्या आघाडीवर दिसल्या. त्यांनी केवळ प्रश्न उपस्थित केले नाहीत, तर समाजाला जागं केलं. आज अशाच निर्भीड, बिनधास्त आणि



दबावाला न घाबरणाऱ्या नेतृत्वाची महिला आयोगाला गरज आहे.

महिलांच्या तक्रारी दाखल होतात, पण त्यावर वेळेत कारवाई होत नाही. अनेक प्रकरणांमध्ये राजकीय दबाव, प्रशासकीय विलंब आणि संवेदनशीलतेचा अभाव स्पष्ट दिसतो. महिला आयोगाकडे अपेक्षा असतात, पण तो अनेकदा केवळ औपचारिक संस्था बनून राहतो. हा बदलायचा असेल, तर आंदोलनातून तयार झालेले नेतृत्वच पुढे आणावे लागेल.

तृप्ती ताई देसाई यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या ग्राऊंडवर काम करणाऱ्या नेत्या आहेत. त्यांनी ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत महिलांच्या समस्या प्रत्यक्ष अनुभवल्या आहेत. त्यामुळे त्या केवळ फाइलवर निर्णय घेणाऱ्या नाहीत, तर प्रत्यक्ष कृती करणाऱ्या नेत्या ठरू शकतात. महिला आयोगाच्या अध्यक्षपदी बसणारी व्यक्ती ही फक्त प्रशासन चालवणारी नसून, व्यवस्थेला प्रश्न विचारणारी आणि गरज पडल्यास धडक कारवाई करणारी असली पाहिजे. तृप्ती ताईंकडे ते धैर्य आहे, ती भूमिका आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे न्यायासाठी झगडण्याची मानसिकता आहे.

आज महिलांना फक्त आश्वासन नको आहे, त्यांना त्वरित न्याय, सुरक्षितता आणि ठोस कारवाई हवी आहे. आणि हे सगळं देण्यासाठी तृप्ती ताईंसारखं नेतृत्वच सक्षम ठरू शकतं.

महिला आयोगाला खऱ्या अर्थाने प्रभावी बनवायचे असेल, तर आता पारंपरिक चौकटी मोडून लढवय्या नेतृत्वाला संधी देण्याची वेळ आली आहे. तृप्ती ताई देसाई यांची नियुक्ती ही केवळ एक पदभरती ठरणार नाही, तर महिला सक्षमीकरणाच्या लढ्याला नवी दिशा देणारा निर्णायक टप्पा ठरेल.

## कॅप्टन खरात प्रकरणात सौ. रुपाली चाकणकर यांचा हकनाक बळी

- एकतर्फी कारवाई बद्दल माजी नगरसेवक योगेश ससाने यांनी व्यक्त केला निषेध

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कॅप्टन खरात प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर होत असलेल्या कारवाईविरोधात माजी नगरसेवक योगेश दत्तात्रय ससाणे यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या प्रकरणात अनेक मोठ्या नेत्यांचे तसेच लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांचे फोटो समोर आले असताना, केवळ चाकणकर यांनाच लक्ष्य केले जात असल्याबद्दल ससाणे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.



ससाणे म्हणाले की, “या प्रकरणात देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मंत्री, खासदार, आमदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे फोटो प्रसिद्ध झाले आहेत. मग फक्त रुपाली चाकणकर यांच्यावरच एवढी आगपाखड का केली जाते?” असा सवाल त्यांनी केला. तसेच काही असंतुष्ट महिला पदाधिकारी स्वतःच्या स्वार्थासाठी पातळी सोडून टीका करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. “जर नैतिकतेचा मुद्दा पुढे केला जात असेल, तर ज्या सर्वांचे फोटो समोर आले आहेत, त्यांनीही समान निकष लावून राजीनामे द्यावेत,” असे ससाणे यांनी स्पष्ट केले.

चाकणकर यांना टार्गेट करण्यामागे त्यांच्या ओबीसी समाजातील ओळखीमुळेच राजकीय हेतू असल्याचा आरोप करत, हा प्रकार संपूर्ण ओबीसी व माळी समाजाची बदनामी करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.